# फाऊंडेशन फॉर इनोव्हेटिव न्यू डायग्नोस्टिक्स आणि इंडिया हेल्थ फंडचा बृहन्मुंबई महानगरपालिकेसोबत सहयोग; मुंबईत कोविड-१९ व क्षयरोग दुहेरी चाचणी उपलब्धतेमध्ये वाढ

- **जलद प्रतिजैविक चाचण्यांमध्ये निगेटिव्ह ठरलेल्या लक्षणे असलेल्या लोकांसाठी जलद, ऑनसाइट कोविड-१९ पुष्टीकरणात्मक चाचणीमध्ये वाढ करण्यासाठी आणि कोविड-१९ लक्षणे असलेल्या लोकांच्या क्षयरोग तपासणी सुविधेसाठी फाइण्ड आणि आयएचएफ मुंबईतील निवडक एमसीजीएम-संचालित रूग्णालयांमध्ये पाच ट्रूनट™ मशिन्स तैनात करत आहेत**

**मुंबई, १७ फेब्रुवारी २०२१:** फाऊंडेशन फॉर इनोव्हेटिव न्यू डायग्नोस्टिक्स (फाइण्ड) आणि टाटा ट्रस्ट्सचा उपक्रम इंडिया हेल्थ फंडने (आयएचएफ) आज घोषणा केली की, ते मुंबईतील निवडक एमसीजीएम-संचालित रूग्णालयांमध्ये पाच ट्रूनट™ मशिन्स तैनात करत आहेत. ट्रूनट हे गोवा-स्थित मोल्बिओ डायग्नोस्टिक्सद्वारे विकसित करण्यात आलेले नाविन्यपूर्ण, अनेक आजाराचे निदान करणारे व्यासपीठ आहे. याद्वारे कोविड-१९ व क्षयरोग (टीबी) चाचणीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेला (एमसीजीएम) मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

कोविड-१९ व टीबी हे समान वैद्यकीय लक्षणे असलेले आजार आहेत आणि दोन्ही आजार श्वसनविषयक ड्रॉपलेट्स व एरोसोल्सच्या माध्यमातून संक्रमित होतात. दोन्ही आजारांचा सामना करण्यासाठी संयुक्त धोरण केंद्रीय आरोग्य मंत्री यांनी टीबीचा सामना करण्यासाठी खाजगी व सामाजिक प्रयत्न करण्यासाठी नुकतेच घेतलेल्या वचनाशी (recent pledge) संलग्न आहे. यामुळे एकाच फोकससह दोन्ही आजारांचे निराकरण करण्यासाठी सरकारच्या दृष्टिकोनाला चालना मिळते.

कोविड-१९ व टीबीच्या दुहेरी आव्हानांचा सामना करण्यासाठी मुंबईमध्ये सादर करण्यात आलेल्या चाचणीमध्ये आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (एमओएचएफडब्ल्यू), भारत सरकारने जारी केलेल्या बाय-डायरेक्टशनल स्क्रिनिंग (bi-directional screening) मार्गदर्शकतत्त्वांच्या (म्हणजेच टीबीसह निदान झालेल्या सर्व लोकांची कोविड-१९ चाचणी करणे आणि कोविड-१९ ची लागण झालेल्या सर्वांची टीबीसाठी चाचणी करणे) अंमलबजावणीचा समावेश आहे.

ट्रूनट हे फाइण्ड आणि आयएचएफ यांच्या सहयोगाने भारतामध्ये विकसित करण्यात आलेले चिप-आधारित, आण्विक नैदानिक व्यासपीठ आहे. हे व्यासपीठ ६० मिनिटांपेक्षा कमी वेळेमध्ये चाचणी अहवाल देते. हे व्यासपीठ टीबीसह विविध आजारांची चाचणी करण्यासाठी रिव्हर्स ट्रान्स्क्रिप्शन पॉलिमेरस चेन रिॲक्शनचा (आरटी-पीसीआर) उपयोग करते. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने (आयसीएमआर) मे २०२० महिना संपण्यापूर्वी कोविड-१९ साठी एक चाचणी सत्यापित केली (validated an assay for Covid-19).

आजच्या घोषणेमुळे त्याच रूग्णालयामध्ये जलद प्रतिजैविक चाचण्यांमध्ये निगेटिव्ह ठरलेल्या लक्षणे असलेल्या लोकांसाठी जलद कोविड-१९ पुष्टीकरणात्मक चाचणीमध्ये वाढ होईल. निवडण्यात आलेले प्रत्येक एमसीजीएम ठिकाण आता ट्रूनट व्यासपीठ, आवश्यक प्रयोगशाळा कर्मचारी, चाचणी साहित्य व उपभोग्य वस्तूंसह सुसज्ज आहेत. या चाचणी सुविधा त्याच परिसरामध्ये किंवा जलद प्रतिजैविक चाचणी करणा-या ठिकाणांपासून जवळच असतील, ज्यामुळे नमुना गोळा करण्यासोबत परिवहन करण्याची आव्हाने कमी होतील, रूग्णांसाठी प्रतिक्षा करावा लागणारा वेळ कमी होईल आणि कोविड-१९चा प्रसार होण्याची शक्यता कमी होईल. परिणामत: कोविड-१९ च्या केसेस समजण्यामध्ये मदत होईल, रूग्णाचे उत्तमरित्या व्यवस्थापन करणे शक्य होईल आणि एमसीजीएमच्या ४टी (ट्रेसिंग, ट्रॅकिंग, टेस्टिंग व ट्रीटिंग) धोरणानुसार हॉटस्पॉट्स (संसर्गित स्थळे) जलदपणे ओळखता येऊ शकतील.

**इंडिया हेल्थ फंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव जोशी** म्हणाले, "ट्रूनट सारख्या अनेक आजारांचे निदान करणा-या व्यासपीठाला पाठिंबा देत आम्ही विद्यमान आरोग्य यंत्रणा क्षमता वाढवण्यासाठी नाविन्यपूर्ण उपचारपद्धतींची ओळख, विकास व अंमलबजावणीला चालना देत आहोत. नाविन्यतांमुळे आरोग्यसेवा प्रतिसाद अधिक प्रबळ होत आहे आणि यासंदर्भात आम्ही एमसीजीएमला त्यांच्या टीबी व कोविड-१९ची तपासणी व निदान करण्याच्या स्थिर प्रयत्नांना मदतीचा हात पुढे करत आहोत."

**फाइण्ड इंडियाचे प्रमुख संजय सरिन** म्हणाले, "टीबी व कोविड-१९ या दोन्ही आजारांचे प्रमाण वाढले असल्यामुळे दोन्ही आजारांकरिता एकीकृत तपासणी हे मुंबईसाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे. आयएचएफ व एमसीजीएमसोबतचा हा सहयोग वेळेवर तपासणी व रूग्णांवर देखरेख ठेवण्याच्या प्रक्रियेला चालना देत अनेकांचे जीवन वाचवण्यास साह्य करेल. परिणामत: आजाराचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल."

फाइण्डच्या या प्रकल्पातील सहभागाला विविध दात्यांचे पाठबळ मिळाले आहे. फाइण्डच्या कोविड-१९ दात्यांची संपूर्ण यादी येथे (*here*) मिळू शकते.

# # #

**फाइण्ड विषयी**

फाइण्ड ही जागतिक ना-नफा तत्त्वावर चालणारी कंपनी आहे. जगातील गरीब लोकांना भेडसावणा-या गंभीर आजारांने निर्मूलन करण्यासाठी डायग्नोस्टिक्सचा विकास व वितरणामधील नाविन्यपूर्ण पद्धतींना ही कंपनी चालना देते. आम्ही आरअ‍ॅण्डडीला तंत्रज्ञान विकासासाठी वैज्ञानिक अडथळे दूर करण्यामध्ये, तसेच नियामक व धोरणकर्त्यांसाठी पुरावा निर्माण करण्यामध्ये, बाजारपेठेतील अयशस्वी कार्यांचे निराकरण करण्यामध्ये आणि अल्प व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये (एलएमआयसी) उपचारपद्धतीला चालना देण्यासोबत डायग्नोस्टिक्स सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये मदत करतो. २००३ पासून आम्ही १५० एलएमआयसींमध्ये वापरण्यात आलेल्या २४ नवीन डायग्नोस्टिक्स साधनांच्या विकासामध्ये साह्यभूत राहिलो आहोत. ५० दशलक्षहून अधिक फाइण्डचे पाठबळ असलेली उत्पादने २०१५ मधील शुभारंभापासून आमच्या लक्ष्य बाजारपेठांना पुरवण्यात आली आहेत. डब्ल्यूएचओ कोलॅबोरेटिंग सेंटर आणि आम्ही जगभरातील २०० हून अधिक शैक्षणिक, औद्योगिक, सरकारी व सामाजिक भागीदारांसोबत काम करतो, तसेच सहा गंभीर आजारांचे निर्मूलन करणा-या ७० हून अधिक सक्रिय प्रकल्पांवर देखील काम करतो. फाइण्ड अशा भविष्याशी कटिबद्ध आहे, जेथे डायग्नोस्टिक्स उपचार निर्णयांना प्राधान्य देईल आणि आजारापासून संरक्षण, नियंत्रण व प्रतिबंधासाठी सुविधा देईल. अधिक माहितीसाठी कृपया www.finddx.org येथे भेट द्या.

**इंडिया हेल्थ फंड विषयी**

इंडिया हेल्थ फंड हा टाटा ट्रस्ट्स व ग्लोबल फंडने सुरू केलेला सहयोगात्मक उपक्रम आहे. हा उपक्रम खालील गोष्टींसाठी सुरू करण्यात आला आहे:

- संसर्गजन्य आजारांच्या निर्मूलनाला चालना देण्यामध्ये मदत करणा-या उल्लेखनीय उपाययोजना ओळखण्याद्वारे आणि त्यांना पाठिंबा देण्याद्वारे भारत सरकार व युएन सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स (एसडीजी) यांच्या ध्येयांशी संलग्न संसर्गजन्य आजारांच्या निर्मूलनाप्रती भारताच्या प्रगतीला चालना देणे.

- संसर्गजन्य आजारांचे निदान, उपचार, नियंत्रण व देखरेखीमधील सर्वोत्तम परिणामांसाठी या उपाययोजनांच्या विकासासाठी अर्थसाह्य करण्याकरिता निधी उभारणे व संसाधनांची अंमलबजावणी करणे.

- नवीन उपाययोजना, व्यवसाय मॉडेल्स व आर्थिक यंत्रणा विकसित करण्यासोबत वाढवण्यासाठी सार्वजनिक व खाजगी विभागांसोबत सहयोग करणे. अधिक माहितीसाठी http://www.indiahealthfund.org/ येथे भेट द्या.

**टाटा ट्रस्ट्स विषयी**

१८९२ मध्ये स्थापना करण्यात आलेली टाटा ट्रस्ट्स ही भारतातील सर्वात जुनी सामाजिक संस्था असून लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्यासाठी स्थापनेपासूनच ही कंपनी प्रयत्नशील आहे. संस्थापक जमशेटजी टाटा यांच्या सामाजिक दृष्टिकोन व तत्त्वांवर आधारित ही संघटना असून आरोग्य, पोषण, शिक्षण, पाणी, सॅनिटेशन व स्वच्छता, उदरनिर्वाह, डिजिटल परिवर्तन, स्थलांतर व शहरी आवास, सामाजिक न्याय व सर्वसमावेशकता, पर्यावरण व ऊर्जा, कौशल्य विकास, क्रीडा आणि कला व संस्कृती या क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणणे टाटा ट्रस्ट्सचे ध्येय आहे. ट्रस्ट्सचे सर्व उपक्रम थेट अंमलबजावणी, भागीदारी आणि अनुदानातून यशस्वी झाले असून या उपक्रमांतून देशासाठी खास संशोधन साध्य केले जाते. अधिक माहितीसाठी कृपया http://tatatrusts.org/ या संकेतस्थळाला भेट द्या.

**मीडिया संपर्क:**

टाटा ट्रस्ट्स: बॉब जॉन
मो.: +91-7506366446
bjohn@tatatrusts.org

करण्ट ग्लोबल: राधिका बंता
मो.: +91-9920038312
rbanta@currentglobal.com

फाइण्ड: करिष्मा सरन,

मो.: +41 (0) 79 823 49 18

media@finddx.org